दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

● वर्ष १६ वे ● अंक १७५ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● रविवार दि.१९ सप्टेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

# काशिद समुद्रात बुडून दोन पर्यटकांचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । मुरुड**

**मुरुडमधील प्रसिद्ध काशिद समुद्रात बुडून दोन पर्यटकांचा मृत्यू झाला आहे. पोहायला उतरलेल्या या तरुणांना पाण्याचा अंदाज न आल्याने ते बुडाले. ही बाब किनार्यावरील जीवरक्षकाच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी दोन्ही पर्यटकांना बाहेर काढत रुग्णालयात दाखल केले. मात्र रुग्णालयात दोघांनाही मृत घोषित करण्यात आले.**

लालटू नस्कर (वय २८) व पालटू सूत्रधर (वय ३८) अशी बुडालेल्या पर्यटकांची नावे आहेत. आज (१८ सप्टेंबर) दुपारी सव्वातीन वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. हे दोघे पर्यटक मूळचे कोलकाता येथील असून, पुण्यात ते कामाला होते. काम करीत असलेल्या ठिकाणच्या अन्य सहकारी कर्मचार्यांसह दोन बसेसमधून हे पर्यटक काशिदला फिरायला आले होते. या पर्यटकांना किनार्यावरील जीवरक्षकांनी समुद्रात न उतरण्याबाबत सूचनाही



दिल्या होत्या. त्यामुळे एका बसमधील पर्यटक समुद्राच्या पाण्यात उतरले नाहीत. मात्र सूचना करुनही दुसर्या बसमधील लालटू नस्कर व पालटू सूत्रधर हे समुद्राच्या पाण्यात उतरले. या दोघांनाही समुद्राच्या पाण्याच्या प्रवाहाचा अंदाज न आल्याने, ते पाण्यात बुडाले.

हे दोघेही पाण्यावर तरंगत असल्याची बाब, जीवरक्षक अमोल कासार यांच्या निदर्शनास आली, तेव्हा त्यांनी क्षणाचाही विलंब न करता त्यांना पाण्याबाहेर काढत किनार्यावर आणले. मात्र दोघेही बेशुद्धावस्थेत होते.

जीवरक्षक अमोल कासार यांनी एटीव्ही बाईकवाले आणि घोडेचालकांच्या मदतीने तातडीने दोघांनाही बोर्ली प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. तेथे त्यांना मृत घोषित करण्यात आले. दरम्यान, जीवरक्षक, स्थानिक ग्रामस्थांनी सूचना करुनही उत्साहाच्या भरात समुद्रात उरतणे या पर्यटकांच्या जीवावर बेतले आहे.

## संक्षिप्त...

### राज्यात गेल्या २४ तासांत कोरोनाचे ३,३९१ नवे रुग्ण

**दै.रायगड नगरी । मुंबई**

देशात कोरोनाने थैमान घातले आहे. कोरोनाग्रस्तांच्या संख्येने तब्बल तीन कोटीचा टप्पा पार केला असून चार लाखांहून अधिक लोकांना आपला जीव गमवावा लागला आहे. कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी मास्क, सोशल डिस्टंसिंग, होम क्वारंटाईन, आयसोलेशनच्या माध्यमातून काळजी घेतली जात आहे. काही राज्यात गंभीर परिस्थिती निर्माण झाली असून प्रशासनाच्या चिंतेत भर पडली आहे. तर दुसरीकडे राज्यात कोरोनाचा धोका वाढत असल्याची माहिती आता समोर आली आहे. गेल्या २४ तासांत कोरोनाचे ३,३९१ नवे रुग्ण आढळून आले आहेत. तर ८० जणांचा मृत्यू झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, राज्यात शनिवारी (१८ सप्टेंबर) कोरोनाचे ३,३९१नवे रुग्ण आढळून आले आहेत. तर ८० जणांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे कोरोनाग्रस्त रुग्णांची संख्या आणि कोरोनामुळे मृत्यू झालेल्यांचा आकडा देखील वाढला आहे. राज्यातील कोरोना रुग्णांची संख्या ही वाढत आहे. याच दरम्यान एक दिलासादायक बाब देखील समोर आली आहे. अनेकांनी कोरोनावर मात केली आहे. गेल्या २४ तासांत ३,८४१ रुग्ण उपचारानंतर बरे झाले आहेत.

### उद्या अंक नाही

दैनिक रायगड नगरीच्या कार्यालयाला अनंत चतुर्दशीनिमित्त १९/०९/२०२१ कार्यालयाला सुट्टी असल्याने दि.२०/०९/२०२१ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचकांनी, जाहिरातदारांनी व वितरकांनी नोंद घ्यावी.

: व्यवस्थापक

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जीवनावरील प्रदर्शनीचे पनवेलमध्ये आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सेवा व समर्पण अभियानातंर्गत जगातील सर्वाधिक लोकप्रिय नेता व देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जीवनावरील प्रदर्शनीचे आयोजन पनवेलमध्ये करण्यात आले असून या प्रदर्शनीचे उद्घाटन भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते आज (दि. १८) करण्यात आले.

भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जगत प्रकाश नड्डा यांच्या सूचनेनुसार १७ सप्टेंबर ते ०७ ऑक्टोबर २०२१ या काळात सेवा व समर्पण अभियान' विविध कार्यक्रमांद्वारे साजरा होणार त्यानुसार जगातील सर्वाधिक लोकप्रिय नेता व देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त देशभरात विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जात आहे. त्या अनुषंगाने उत्तर रायगड जिल्हा आणि पनवेल भाजपच्या वतीने 'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे व्यक्तिमत्व व जीवनावरील' आधारित तीन दिवसीय प्रदर्शनीचे ओरिअन मॉलमध्ये आयोजन करण्यात आले आहे.

या प्रदर्शनाच्या उदघाटन .../२



संपूर्ण जगात आपल्या भारत देशाचे नाव अभिमानाने उंचवण्याचे काम आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. देशात विविध योजना अंमलात आणून देशाचा विकास करण्याचे काम ते करीत आहेत. जगात कोरोनाचे संकट जाळे आले, अनेक देश त्यात हतबल झाले. मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तात्काळ उपाययोजना करत या संकटात देशासह जगाला आदर्श दिले. देशाला आत्मनिर्भर करण्याचे काम त्यांच्या माध्यमातून होत आहे. काल १७ सप्टेंबरला अडीच कोटी नागरिकांचे कोविड प्रतिबंधात्मक लसीकरण करून विश्वविक्रम झाला आहे, अशाप्रकारे देशाच्या विकासाचे अनेक विक्रम पंतप्रधान नरेंद्र मोदी करत राहतील. देशाच्या विकासाच्या अनुषंगाने नवभारतच्या निर्मितीत प्रत्येक नागरिकाने सहभाग घेतला पाहिजे.

**- आमदार प्रशांत ठाकूर**

# नांदगावच्या पुलावरील रेलिंग खाली पडले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नागरिकांच्या सुरक्षेसाठी नांदगाव पुलावर लावलेले रेलिंग खाली पडले आहेत. तर काही ठिकाणचे रेलिंग तुटले आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा नागरिकांच्या जीवाला अपघाताचा धोका निर्माण झाला आहे.

नांदगाव येथील पुलावर कोणत्याही प्रकारची सुरक्षा नसल्याने येणा जाणार्या नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण होत असे. दरवर्षी पावसाळ्यात नागरिकांना या त्रासाला सहन करावा लागत असे. पावसाळ्यात या पूलावरून पाणी जाते. त्यामुळे पूल खराब झाला आहे. काही ठिकाणी पूल खचला असल्याचे समोर आले आहे. जिल्हा परिषदेच्या वतीने हा पूल बांधण्यात आलेला आहे. मात्र त्याची डागडुजी रखडलेली आहे. पुलाच्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर खड्डे पडल्यामुळे नांदगावमध्ये जाणे-येणे धोकादायक झाले आहे. लाखो रुपये खर्च करून लोखंडी रेलिंग टाकण्यात आले. मात्र काही वर्षातच हे रेलिंग खाली तुटून पडले आहेत. त्यामुळे या पुलावरून वाहतूक करणाऱ्या नागरिकांच्या जिवाला धोका उत्पन्न झाला आहे.



# कर्जत तालुक्यातील बोरगाव येथे शेतकरी तरुणाचा खून

## पूर्ववैमनस्यातून खून झाल्याचा संशय





**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील नेरळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या बोरगाव गावातील एका ३८ वर्षीय शेतकरी तरुणाचा आज १८ सप्टेंबर रोजी सकाळी खून झाला आहे.

जगदीश अंकुश पाटील हा ३८ वर्षीय तरुण होमगार्डची नोकरी सोडून दिल्यानंतर गेली सहा वर्षे म्हशी आणि गायी यांच्या माध्यमातून दुग्ध व्यवसाय करीत होता. होमगार्डची नोकरी सोडल्यानंतर जगदीश पाटील हा तरुण आपल्या कुटुंबाची गुरे आणि गायी-म्हशी यांचे पालन करण्यास सुरुवात केली. गायी म्हशी यांचा बेडा बोरगाव गावापासून पोश्री नदीच्या पलीकडे ओलमण रस्त्यावर असून दररोज सकाळी सहा पूर्वी जगदीश हा तेथे गायी-म्हशी यांचे दूध काढण्यासाठी पोहचत असे. गावापासून लांब असल्याने फार कोणाची वहिवाट त्या भागात नाही.

आज १८ सप्टेंबर रोजी जगदीश अंकुश पाटील हा पहाटे साडेपाच वाजता घरातून तबेला (बेड्यावर) जाण्यास निघाला होता. त्यांनतर शेताकडे गेलेला जगदीशचा काका सुरेश सीताराम पाटील .../२

# नोंदणी न करता बेकायदेशीरपणे लहान मुलांसाठी निवासाची व्यवस्था

## खारघर मधील संस्थेविरुध्द गुन्हा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर मधील नई आशा (न्यू होप) चॅरिटेबल ट्रस्टने बालकल्याण विभागाकडे नोंदणी न करता बेकायदेशीररित्या लहान मुलांसाठी निवासाची व्यवस्था केल्याचे आढळून आल्याने रायगड जिल्हा बालसंरक्षण अधिकाऱ्यांनी या संस्थेच्या ताब्यात असलेल्या १३ अल्पवयीन बालकांना खांदा कॉलनी येथील बालग्राम येथे स्थलांतरीत केले आहे. तसेच सदर संस्थेच्या अध्यक्षाविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

खारघर, सेक्टर-१२ मधील अनुग्राम रोहाऊसमध्ये नई आशा (न्यू होप) चॅरिटेबल ट्रस्ट नावाची संस्था अनधिकृतपणे चालवण्यात येत असल्याची तक्रार पुणे येथील राज्य महिला बालविकास विभागाकडे करण्यात आली होती. त्यामुळे पुणे येथील राज्य बाल संरक्षण संस्थेचे सदस्य सचिव तथा राज्य महिला बाल विकास आयुक्तांनी सदर ठिकाणी प्रत्यक्ष भेट दिली. तसेच संस्थेच्या कामकाजाची चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल सादर करण्याचे आदेश रायगड जिल्हा महिला-बाल विकास अधिकारी आणि रायगड बाल कल्याण समितीला दिले होते. त्यानुसार रायगड जिल्हा बाल संरक्षण अधिकारी सुजाता सकपाळ, जिल्हा परिवीक्षा अधिकारी अशोक पाटील, रायगड जिल्हा महिलाबाल विकास अधिकारी व्यंकट तरवडे, रायगड बाल कल्याण समिती सदस्य रोशनी ठाकूर तसेच आरंभ इंडिया प्रकल्प संस्थेच्या शेफाली शिरसेकर यांनी १२ ऑगस्ट रोजी खारघर, सेक्टर-१२ मधील नई आशा (न्यू होप) चॅरिटेबल ट्रस्टला भेट देऊन संस्थेची तपासणी केली होती. या तपासणीत सदर संस्थेकडे रायगड धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र आढळून आले होते. मात्र, सदर संस्थेने बालकल्याण विभागात नोंदणी न करता बेकायदेशीररित्या संगोपन आणि .../२

# डायलिसिस सेंटर किडनी शुद्धीकरण केंद्र सुरू करून तज्ञाची निवड करण्याची मागणी

## विरोधी पक्ष नेते प्रीतम म्हात्रे यांनी दिले पालकमंत्री आदिती तटकरे यांना निवेदन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तीर्थरूप नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयातील डायलिसीस सेंटर किडनी शुद्धीकरण केंद्र सुरू करून तज्ज्ञांची निवड करण्याची मागणी पनवेल महापालिकेचे विरोधी पक्ष नेते प्रीतम म्हात्रे यांनी राज्याच्या राज्यमंत्री आणि रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री आदिती तटकरे यांच्याकडे केली आहे



पनवेल शहरातील तीर्थरूप नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयात डायलिसिस सेंटर सुरू करत आहोत. सेंटर सुरू करण्यास काही महिन्यापासून लागणारी उपकरणे देखील येथे बसवण्यात आलेली आहेत. परंतु तज्ञांची निवड करण्यात आली नसल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे. रायगड जिल्ह्या-तून येथे उपचार घेण्यासाठी अनेक रुग्ण येत असतात. किडनी आणि मूत्रपिंडाच्या आजाराने त्रस्त रुग्णांना खासगी रुग्णालयात उपचार घेणे खर्चिक असल्याने जिल्ह्यातील रुग्ण दगावण्याची संख्यादेखील वाढत आहे. त्यामुळे तातडीने संबंधित विभागास आदेश देऊन नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयात तज्ञांची निवड करून सेंटर .../२

# द्रोणागिरी नोड मधिल डांबरी रस्त्यांच्या खड्ड्यांमध्ये मातीची भर

**दै.रायगड नगरी । उरण**

करोडो रुपये खर्ची घालून तयार केलेल्या द्रोणागिरी नोड मधिल रस्त्यांची पार दुर्दशा झाली आहे.एप्रिल महिन्यात बनविलेल्या रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडल्याने रस्ताच खड्ड्यांमध्ये हरवला आहे.या रस्त्यांची आता दुरुस्ती सुरू झाली असून डांबरी रस्त्यांवर खड्डे बुजविण्यासाठी आता मातीची भर टाकण्यात येत आहे.सिडको प्रशासनाच्या या अजब कारभाराने जनतेत आश्चर्य व्यक्त होत आहे.

द्रोणागिरी नोड मधिल कोस्टल रोड सोडल्यावर असलेल्या रस्त्याचे एप्रिल मे महिन्यात डांबरीकरण करण्यात आले होते.मात्र निकृष्ट काम केल्याने हे डांबरीकरण अवघ्या काही दिवसात उखडले गेले.त्यामुळे या रस्त्यात भर पावसाळ्यात मोठमोठे खड्डे तयार होऊन त्यात पावसाचे पाणी साठून रस्त्यावर तळी निर्माण झाली.पर्यायाने वाहन चालकांना या रस्त्यावरून वाहन चालविणे मुश्किल झाले. आता पाऊस जरा कमी होताच सिडको प्रशासनाने हे खड्डे बुजविण्याचे काम हाती घेतले आहे. मात्र हे खड्डे डांबरी खडीने बुजविण्याऐवजी कंत्राटदाराने या खड्ड्यांमध्ये माती टाकून खड्डे बुजविलेआहेत. पावसाळा अजून संपला नसल्याने जरी थोडासा पाऊस पडला तरी या बुजविलेल्या खड्ड्यांमध्ये चिखलाचा राडा होऊन या रस्त्याची वाट अजून बिकट होणार आहे.

# अवजड वाहनांमुळे दिघी महामार्ग जाम

## रस्त्याच्या मध्यभागी उभे ट्रेलरमुळे वाहतूक कोंडी

**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन तालुक्यातील वडवली - दिघी मार्गावरील भरणे घाट येथे शुक्रवार दिनांक १७ रोजी रात्री ३ वाजण्याच्या सुमारास दिघी पोर्ट कडून अवजड वाहतुक करणारा ट्रक बंद पडल्याने हा रस्ता वाहतुकीसाठी बंद झाला. पावसामुळे चिखलयुक्त रस्त्यावर वाहतूक सुरळीत करण्यासाठी पहाटेपर्यंत वाट पाहावी लागली.

एकीकडे या दिघी - पुणे महामार्गाचे काम वेळास ते दिघी दरम्यान अर्धवट स्थितीत आहे. तर याच रस्त्यावर दिघी पोर्ट कडून ओव्हरलोड वाहतूक सुरू आहे. या मार्गावर वाहनांची वर्दळ मोठया प्रमाणात होत असताना बिनदिक्कत पणे रस्त्यात मोठे ट्रेलर उभे करून वाहतुकीला अडथळा निर्माण केल्याने वडवली - दिघी रस्त्यावर भरणे घाटात तब्बल पाच तास वा-हतूक कोंडी झाली. या वाहतूक कोंडी विरोधात



प्रवाशांनी संताप व्यक्त केला.

या मार्गावर पहाटे प्रवास करणाऱ्या महामंडळाच्या एसटी व इतर प्रवाशी, रुग्ण अशा अनेक वाहनांना दोन .../२

# बॅड आयडिया?

सार्वजनिक क्षेत्रातील म्हणजे सरकारी बँकांच्या डोक्यावर असणारा बुडित कर्जांचा वाढता बोजा कमी करण्यासाठी काहीतरी यंत्रणा असावी, अशी मागणी पंतप्रधान मोदींच्या पहिल्या कार्यकाळातच जोर धरू लागली होती. या मागणीनुसार अर्थकारणाच्या लोकभाषेत जिला 'बॅड बँक' असे म्हणतात, अशी कंपनी स्थापन करण्यास केंद्रीय मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. या निर्णयाने कातावलेल्या राष्ट्रीयीकृत बँका सुटकेचा नि:श्वास टाकतील. मात्र, या निर्णयाने सर्वसामान्य नागरिकाचे काही भले होणार आहे का, याचा विचार करायला हवा. आता नॅशनल ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड' म्हणजे 'राष्ट्रीय मालमत्ता पुनर्रचना कंपनी' स्थापन होईल. बँकांकडील बुडालेली कर्जे या कंपनीकडे वर्ग करून बँकांचे ताळेबंद साफसूफ करणे, हा या नव्या कंपनीच्या स्थापनेमागचा मुख्य उद्देश आहे. एका अर्थाने, कर्जे देणाऱ्या बँकांवर यापुढे दिलेले प्रत्येक कर्ज वसूल करण्याची किंवा ते कर्ज ताळेबंदात दाखवत राहण्याचे बंधन नसेल. हा एका बाजूने त्यांना मिळालेला मोठा दिलासा आहे; दुसरीकडे, भारतात सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा आणि त्यांच्याकडून घेतलेल्या कर्जांचा प्रचंड गैरवापर सर्वच सत्ताधारी आणि त्यांचे औद्योगिक क्षेत्रातील बगलबच्चे यांनी केला आहे. त्या सर्वांसाठी बुडीत कर्जे कायमची बुडवून टाकण्यासाठी कायमची अधिकृत व्यवस्थाच निर्माण झाली, असेही म्हणता येईल. बँकांकडची बुडीत कर्जे एकदा बॅड बँकेकडे वर्ग झाली की, त्यांना उद्योजकांना नवी कर्जे देण्यास वाव मिळेल आणि एकंदरीत आर्थिक विकासाच नवी चालना मिळेल, असा युक्तिवाद केला जातो. त्यात काही तथ्य आहे. मात्र, बँकांना बुडवणारे उद्योगपती आणि प्रामाणिक परतफेड करणारे उद्योजक असे दोन वर्ग कायमच असतात. करोनासारखे संकट नेहेमी येत नाही. त्यामुळे, बॅड बँकेच्या स्थापनेनंतर देशातल्या बँकांच्या तिजोऱ्या नेमक्या कुणासाठी आणि किती प्रमाणात खुल्या होणार, या प्रश्नाचे उत्तर अजून मिळायचे आहे. कदाचित, याच कारणांसाठी केंद्र सरकारचे मुख्य आर्थिक सल्लागार के. सुब्रमणियन हे या कल्पनेला आधी बराच विरोध करीत होते. अर्थमंत्री आणि इतरही नेत्यांनी बॅड बँक स्थापनेचा निर्धार केलेलाच दिसतो, हे लक्षात आल्यानंतर सुब्रमणियन यांनी त्यांची भाषा बदलली. विरोध सौम्य केला. मात्र, त्यांनी या संकल्पनेला विरोध करताना केंद्र सरकारने सरकारी बँकांना नव्याने भांडवल पुरवताना तब्बल दोन लाख ६५ हजार कोटी रुपये त्यांच्या तिजोरीत ओतले आहेत, याची आठवण करून दिली होती. याचा अर्थ, एकीकडे भांडवलाची चणचण भासणाऱ्या बँकांना भांडवलही पुरवायचे आणि काही दिवसांनी त्यांचे कर्जरूपाने बाहेर गेलेले भांडवल परत येत नाही, या कारणासाठी 'बॅड बँक'ही स्थापन करायची. हा दुहेरी आतबट्ट्याचा व्यवहार झाला. मुख्य म्हणजे, यातून केवळ बड्या भांडवलदारांचा लाभ होणार पण छोट्या बँका, सहकारी संस्था किंवा सहकारी बँका यांच्याकडून कर्जे घेणारे छोटे उद्योजक, कारखानदार यांचा काही फायदा होणार आहे का, हा प्रश्न आहेच. बॅड बँकेची संकल्पना नवी नाही. ती दुसऱ्या महायुद्ध काळातच जन्माला आली आहे. आज जगात अनेक देशांमध्ये अशी व्यवस्था आहे. भारताने १९९१ मध्ये जो उदारीकरणाचा प्रवास सुरू केला, त्यात कधी ना कधी बॅड बँकेची स्थापना होणार होतीच. केंद्र सरकारचे माजी मुख्य आर्थिक सल्लागार अरविंद सुब्रमणियन गेली निदान सहा-सात वर्षे ही कल्पना मांडत होते. बॅड बँकेने बुडीत कर्जे आपल्याकडे घेतल्यानंतर त्यांची वसुली किंवा प्रमाणबद्ध माफी याबाबत निर्णय घेणे व कृती करणे, अपेक्षित आहे. अमेरिकेत अशी बॅड बँक कर्जवसुली झाल्यामुळे कशी फायद्यात येऊन बंद केली, असे उदाहरण सध्या दिले जात आहे. मात्र, भारतात असे यश येण्याची शक्यता किती आहे, हे सर्वांना माहीत आहे. शिवाय, असे यश मिळणारच असेल तर राष्ट्रीयीकृत बँकांनीच आपली कर्जवसुली यंत्रणा तगडी करून नफ्यात का येऊ नये? बँकांनी गेल्या काही वर्षांमध्ये विक्रमी कर्जवसुली केली आहे, असे अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटले आहे. तरीही, दोन लाख कोटी रुपयांचे कर्ज वसूल होऊ शकलेले नाही. ही कर्जे टप्प्याटप्प्याने बॅड बँकेच्या खातेवहीत जाऊ शकतील. देशातील बँकिंग व्यवस्थेला शिस्त लावून, तिच्या साऱ्या व्यवहारांमध्ये पारदर्शकता आणण्यामध्ये आजवर एकाही सरकारला निखालस यश मिळालेले नाही. या अपयशाच्या कारणांची स्वतंत्र आणि सविस्तर चर्चा करावी लागेल. एकीकडे, हे अपयश झाकायचे आणि दुसरीकडे, बँकांच्या खातेवहीतील बुडीत कर्जे दुसरीकडे हलवून सामान्य माणसाला दिलासा दिल्याचा आभास निर्माण करायचा, यातून तर बॅड बँकेचा जन्म झाला नसेल ना? तसे असेल तर भारतीय अर्थकारणाच्या अंतिमत: ते हिताचे ठरणार नाही.

# जबाबदार नागरिक घडविण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासून सदाचार आणि शिष्टाचाराच्या कथा रुजवाव्यात : राज्यपाल

**दै.रायगड नगरी । मुंबई**

लहानपणापासून विद्यार्थ्यांमध्ये सदाचार आणि शिष्टाचाराच्या कथा रुजवून त्यांना चांगले शिक्षण द्यावे. जेणेकरून जबाबदार नागरिक घडविण्याकामी त्याचा फायदा होईल. यासाठी शिक्षणसंस्थांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांनी शहापूर तालुक्यातील किन्हवली येथे झालेल्या कार्यक्रमात केले.




किन्हवली येथील विद्या प्रसारक मंडळाच्या विधी महाविद्यालयाचे उद्घाटन, पदव्युत्तर शाखेचा शुभारंभ आणि महाविद्यालयाच्या विस्तारीत इमारतीचा पायाभरणी समारंभ राज्यपाल श्री.कोश्यारी यांच्या हस्ते झाला. यावेळी केंद्रीय पंचायत राज राज्यमंत्री कपिल पाटील, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत, आमदार दौलत दरोडा, माजी आमदार गोटीराम पवार, पांडूरंग बरोरा, व्हीपीएम संस्थेचे अध्यक्ष अरविंद भानुशाली आणि मंत्रालय विधीमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष मंदार पारकर व्यासपीठावर उपस्थित होते.

राज्यपाल श्री.कोश्यारी म्हणाले, व्हीपीएम संस्थेच्या माध्यमातून दुर्गम भागामध्ये शिक्षणाचे चांगले काम सुरु असून शिक्षणसंस्थेच्या विधी महाविद्यालयामुळे या भागातील विद्यार्थ्यांची सोय होणार आहे. समाजात लहानपणापासून विद्यार्थ्यांवर सदाचाराचे आणि शिष्टाचाराचे संस्कार झाले पाहिजे. चांगले चारित्र्य घडविण्यासाठी लहानपणापासून विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण देणे आवश्यक आहे. समाजामध्ये महिलांविषयी आदराची भावना निर्माण करतानाच माता-भगिनी या आपला आधार असल्याचे सांगत राज्यपाल श्री.कोश्यारी म्हणाले की, सामाजिक कार्यामध्ये महिलांना मोठया संख्येने सहभागी करुन त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. क्षेत्र कुठलेही असो आजच्या घडीला मुलांपेक्षा मुलीच अग्रेसर असल्याचे कौतुकोद्गार राज्यपालांनी यावेळी काढले.

दुर्गम आणि आदिवासी भागामध्ये शिक्षणाची गंगा आणण्याचे काम या संस्थेमार्फत झाले असून, कोरोना काळात रोजगार निर्मिती बरोबरच गरजूंना धान्य वाटप करुन शिक्षणासोबत समाजसेवेचा वसा जपल्याचे केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांनी यावेळी सांगितले. केंद्रीय पंचायत राज विभागाच्या माध्यमातून देशातील २ लाख ५५ हजार ग्रामपंचायती पच्या माध्यमातून जोडण्यात येत असून प्रत्येक राज्यातील भाषेत हे प असणार असल्याचे श्री.पाटील यांनी सांगितले. त्या माध्यमातून केंद्राच्या २३ योजनांचा लाभ देण्याचा प्रयत्न करण्यात येत असून राज्य व केंद्र शासनाच्या समन्वयातून ग्रामीण भागातील जनतेला लाभ देण्याचा प्रयत्न असल्याचे श्री. पाटील यांनी सांगितले. या उपक्रमांतर्गत ठाणे जिल्ह्यातील १० गावांची प्रायोगिक तत्वावर निवड करण्यात आल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

राज्यातील सर्व महाविद्यालयांमध्ये अभ्यासक्रमात राष्ट्रीय छात्र सेना विषयाचा समावेश करण्याचा निर्णय घेतला आहे, असे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी सांगितले. राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांनी कोरोना काळात कोवीड योध्दा म्हणून भूमिका बजावल्याचे सांगत किन्हवली परिसरामध्ये कृषि महाविद्यालय होण्यासाठी सहकार्य करु असे त्यांनी सांगितले.

# तीर्थरूप कै. विठोबा खंडाप्पा गुळवे यांची पुण्यतिथी साजरी



**दै.रायगड नगरी । पनवेल**

तीर्थरूप कै. विठोबा खंडाप्पा गुळवे यांची पुण्यतिथी शनिवार दिनांक -१८/९/२०२१ रोजी सकाळी नऊ वाजता शाळेत साजरी करण्यात आली.

सदर कार्यक्रमाला शाळा समिती सभापती शिक्षक आमदार बाळाराम पाटील व विरोधी पक्षनेते तथा शाळा समिती सदस्य प्रितम जनार्दन म्हात्रे, सागर आटवणे, शाळा समिती सदस्य, मुख्याध्यापकप्रमोद ठाकूर सर, शालेय शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

# सुधागड तालुक्यातील ढोकळेवाडी शाळेतील शिक्षकाची आत्महत्या

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यातील ढोकळेवाडी शाळेतील शिक्षक अमोल कांबळे (वय ३७) यांनी शाळेत गळफास लावून आत्महत्या केली असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या घटनेने संपूर्ण सुधागड तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे.



शिक्षक कांबळे हे अनेक दिवस मानसिक तणावात होते. अचानक त्यांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होतेय. या घटनेची पाली पोलीस स्थानकात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

गावातील एक ग्रामस्थाने कांबळे यांच्या मोटारसायकलला चावी पाहून त्यांना शाळेत पाहण्यास गेला असता कांबळे गळफास लावलेल्या स्थितीत दिसले. ग्रामस्थांनी लगेच पोलिसांना ही घटना कळवली.

अमोल कांबळे यांच्या पच्छात पत्नी, एक लहान मुलगा व एक मुलगी असा परिवार आहे. सायंकाळी उशिरा त्यांचा मृतदेह त्यांचे मूळ गाव वडजा तालुका वाशीम जिल्हा उस्मानाबाद येथे नेण्यात आला. कांबळे यांच्यावर मानसिक आरोग्य संदर्भात उपचार सुरू होते. अशी माहिती त्यांच्या काही सहकाऱ्यांनी दिली. त्यांच्या या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस निरीक्षक विजय तायडे हे करीत आहेत.

# कोरोनात पनवेल महानगरपालिकेची उत्कृष्ट कामगिरी ; रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९८ टक्क्यावर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोनाची दुसरी लाट थोपविण्यात पनवेल महानगरपालिकेला यश आले आहे.पालिका क्षेत्रात रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९८ टक्क्यावर पोहचले आहेत.पालिका आयुक्त गणेश देशमुख यांनी कोरोनावर नियंत्रण मिळविण्यासाठी केलेल्या प्रयत्नांना यश आले असुन सध्याच्या घडीला पालिका क्षेत्रातील पॉसिटीव्हिटी रेट देखील नियंत्रणात आल्याने रुग्ण वाढीला ब्रेक लागला आहे.

सध्याच्या घडीला पालिका क्षेत्रात ६४ हजार १७२ जणांना कोरोनाची लागण झाली होती.त्यापैकी ८५ हजार ८९९ रुग्ण कोविड वर मात करून पूर्णपणे बरे झाले तर १३२४ जणांचा या बाजारातून दुर्दैवी मृत्यू झाला आहे.एकेकाळी पालिका क्षेत्रात सक्रिय रुग्णांचा आकडा हजारोंच्या संख्येने होता.त्याच्यावर पालिकेला नियंत्रण मिळविण्यास यश आले असुन सध्याच्या घडीला केवळ ४०३ सक्रिय रुग्ण आहेत.पालिका क्षेत्रात आहेत.कोरोनाच्या पहिल्या लाटेत देखील आयुक्त गणेश देशमुख यांनी उत्कृष्ट कामगिरी केली होती.मात्र शासनामार्फत त्यांची अचानक बदली ठाणे येथे अतिरिक्त आयुक्त पदी करण्यात आली.यावेळी सुधाकर देशमुख यांनी देखील कोरोनाची परिस्थिती योग्य रित्या हाताळली.चार महिन्यापूर्वी पुन्हा गणेश देशमुख यांची पनवेलच्या आयुक्तपदी वर्णी लागल्यावर दुसरी लाट पीक वर असताना देशमुख यांनी परिस्थिती अतिशय उत्तम रित्या हाताळली.मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ आनंद गोसावी यांनी देखील आयुक्त देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली अतिशय जाणीवपूर्वक परिस्थिती हाताळली. दुसरी लाट थोपविण्यात पालिकेला यश आले असले तरी पालिकेने तिसर्या लाटेची सर्वतोपरी तयारी केली आहे.कळंबोली याठिकाणी ६५० बेड्चे जम्बो कोविड केअर सेंटर सिडकोच्या मदतीने तयार झाले असल्याने भविष्यात तिसरी लाट आली असली तरी पालिका प्रशासन याकरिता पूर्णपणे त्यासाठी तयार असल्याचे आयुक्तांनी यापूर्वीच स्पष्ट केले आहे.खाजगी कोविड रुग्णालयांना देखील पालिका आयुक्तांना योग्य त्या सुचना केल्या आहेत.कोविड ची साथ नियंत्रणात आणण्यासाठी जास्तीत लसीकरण हे धोरण पालिकेने अवलंबले असुन सध्याच्या घडीला दररोज १५ हजार नागरिकांचे लसीकरण केले जात आहे.पालिका क्षेत्रात ६ लाख नागरिकांचे लसीकरण पालिकेमार्फत पूर्ण झाले आहे. दुसरी लाट नियंत्रणात आली असली तरी तिस-या लाटेची शक्यता तज्ञांनी व्यक्त केली आहे.पालिका प्रशासन त्याकरिता सज्ज असले तरी तिसरी लाट हि नागरिकांच्या हातात देखील आहे.कोविडच्या नियमांचे तंतोतंत पालन केल्यास कोरोनावर पूर्णपणे नियंत्रण मिळविण्यास आपणास सर्वांना यश येईल असे आयुक्त गणेश देशमुख यांनी सांगितले.याकरिता नागरिकांनी शासनाने सांगितलेल्या नियमांचे पालन करण्याचे आवाहन आयुक्त देशमुख यांनी केले आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जीवनावरील प्रदर्शनीचे पनवेलमध्ये आयोजन

सोहळ्यास भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहराध्यक्ष जयंत पगडे, महानगरपालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर, ज्येष्ठ नेते सुनिल घरत, भाजपचे शहर सरचिटणीस व नगरसेवक नितीन पाटील, माजी उपमहापौर नगरसेविका चारुशीला घरत, नगरसेविका दर्शना भोईर, राजेश्री ववेकर, रुचिता लोंढे, वृषाली वाघमारे, पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, ओरिअन मॉलचे संचालक मनन परुळेकर, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, तालुका अध्यक्ष आनंद ढवळे, शहराध्यक्ष रोहित जगताप, चिन्मय समेळ, प्रसाद हनुमंते, आदी उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी सदैव गरीब, वंचित, दलित, आदिवासी, मागास आणि शेतक-यांच्या कल्याणासाठी समर्पित आहेत. अनेक दशकानंतर समाजातील उपेक्षित घटकांचा आवाज मोदी सरकार कडून ऐकले जात असून जनतेच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी सरकार सज्ज आहे. श्री. नरेंद्र मोदी राज्याचे मुख्यमंत्री व देशाचे पंतप्रधान म्हणून ०७ ऑक्टोबर, २०२१ ला जनतेच्या आशिर्वादाने जनसेवक म्हणून २० वर्ष पूर्ण करत आहेत. ०७ ऑक्टोबर, २००१ ला गुजरातचे मुख्यमंत्री व २०१४ रोजी जगातील सर्वात मोठ्या लोकशाही असलेल्या देशाचे पंतप्रधान झाले. लोकशाहीत लोकनेता ही संधी फार कमी नेत्यांना मिळत असून नरेंद्र मोदी यांची निरंतर वाढणारी लोकप्रियता दर्शवत आहे. यावर्षी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जनसेवक म्हणून २० वर्षे कार्यकाळ पूर्ण झाल्याचा सुखद योगायोग व आनंदी क्षण देशभर मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. १७ सप्टेंबर ते ०७ ऑक्टोबर २०२१ या काळात सेवा व समर्पण अभियान' अंतर्गत दिव्यांगांना कृत्रिम अवयव, उपकरणे वाटप, आरोग्य तपासणी शिबीर, गरीब वस्ती, अनाथाश्रम, वृद्धाश्रम व रुग्णालयांना भेट देऊन फळे वाटप, प्लॅस्टिक निर्मूलन मोहीम, रक्तदान शिबीर, धान्य वाटप, कापडी पिशव्यांचे वाटप, नदी सफाई अभियान, अशाचप्रकारे विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जाणार आहेत.

## कर्जत तालुक्यातील बोरगाव येथे शेतकरी तरुणाचा खून

यांनी साडे सहा वाजता जगदीश अंकुश पाटील यांना बेड्याबाहेर उबडे पडलेले पाहिले.त्यावर ही माहिती सांगण्यासाठी सुरेश पाटील हे धावत गावात आले. साधारण पावणेसात वाजता अंकुश पाटील यांच्या घरी ही माहिती मिळताच घरातील सर्व मंडळी ओलमण रस्त्यावर असलेल्या बेड्यावर पोहचली. त्यावेळी जगदीश अंकुश पाटील यांच्या तोंडातून रक्त तसेच फेस आलेला होता, त्याचवेळी त्यांच्या गळ्याला काहीतरी फास आवळल्याच्या खुना दिसत होत्या, तसेच शरीरावर काही जखमा देखील होत्या. त्यामुळे अंकुश पाटील आणि त्यांच्या कुटुंबाने बेशुद्ध अवस्थेत असलेल्या जगदीश अंकुश पाटील यांना उचलून इको गाडी मधून चार किलोमीटर अंतरावर असलेल्या कळंब येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार करण्यासाठी नेले. तेथे तपासणीअंती प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टरांनी साडे सातच्या दरम्यान जगदीश अंकुश पाटील यांचा मृत्यू झाला असल्याचे जाहीर केले.

## नोंदणी न करता बेकायदेशीरपणे लहान मुलांसाठी निवासाची व्यवस्था

संरक्षणाची आवश्यता असलेल्या बालकांच्या निवासाची व्यवस्था केल्याचे आढळून आले. तसेच सदर संस्थेच्या ताब्यात १३ अल्पवयीन मुले असल्याचे आढळून आले. तपासणी समितीने याबाबतचा अहवाल दिल्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी संबंधित संस्थेविरोधात कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार त्यानुसार रायगड जिल्हा बालसंरक्षण अधिकाऱ्यांनी या संस्थेच्या ताब्यात असलेल्या १३ अल्पवयीन मुलांना खांदा कॉलनी येथील बालग्राम संस्थेमध्ये स्थलांतरीत केले. त्यानंतर सदर संस्थेविरोधात खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी नई आशा (न्यू होप), चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष कार्तिक राजेंद्र सरकार यांच्या विरोधात बालन्याय (मुलांची काळजी-संरक्षण) अधिनियम २०१५ चे कलम ४१(१), ४२ नुसार गुन्हा दाखल करुन या प्रकरणाच्या तपासाला सुरुवात केली आहे.

## डायलिसिस सेंटर किडनी शुद्धीकरण केंद्र सुरू करून तज्ञाची निवड करण्याची मागणी

सुरू करण्यात यावी अशी मागणी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, नगरसेविका प्रीती जॉर्ज, डॉक्टर सुरेखा मोहोकर, सारिका भगत यांनी केली आहे.

याबाबत पालकमंत्री आदिती तटकरे यांच्याशी संपर्क साधला असता डायलिसिस सेंटर किडनी शुद्धीकरण केंद्र सुरू करून तज्ञाची निवड करण्यासाठीची माहिती घेऊन काम करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगीतले.

## अवजड वाहनांमुळे दिघी महामार्ग जाम

तासाहून अधिक वेळ या वाहतूक कोंडीत अडकून बसावे लागले. तर काहींना सर्वे व तुरंबाडी या मार्गाने उलट प्रवास करावा लागला. दिघी रस्त्यावर पावसामुळे चिखल झाल्याने रस्ता सुरळीत करण्यास अनेक अडथळे येत होते. वाहने बाजूला घेण्यास उशीर झाले. ट्रेलर रस्त्याच्या मध्यभागी नादुरुस्त होऊन बंद झाल्याने वाहने ये-जा करण्यास अडथळा निर्माण होत होता. सकाळी ८ वाजण्याच्या दरम्यान बंद झालेला ट्रेलर बाजूला करण्यात आला. त्यानंतर वाहने सुरळीत जाण्यास सुरुवात झाली. रस्त्याचे अर्धवट काम व अवजड वाहतूक यामुळे घाटात सतत वाहतूक कोंडी होत आहे.

Shri.Rao Saheb

Applicant Advocate : Shri.Rajiv Kumar Gupta

**PUBLIC NOTICE**

IN THE COURT OF CIVIL JUDGE (S.D.) PANVEL AT PANVEL

Civil M.A. No.1266/21
Exh : 8/D
Next Date : 10/11/2021

1) MR.RAMANLAL KANJIBHAI PATEL
Age : 79 Yrs, Occupation-Retired
2) MR.VINOD RAMANLAL PATEL
Age : 51 Yrs, Occupation-Service
3) MRS.RANJAN MANISH CHOPDA
Age : 54 Yrs, Occupation-House wife
4) MRS.NAYNA PARESH PATEL
Age : 56 Yrs, Occupation-House wife
Residing at- Jay Ambe Society,
Flat No.702, Neelyog Sukruti, Bld.No.03,
Opp Patel Nagar, M G Cross Road No.04,
Kandivali West, Mumbai-400067 Applicants

WHEREAS the above named Applicants have filed the application for Heir ship Certificate of deceased LATE.SHANTABEN RAMANBHAI PATEL, Alias SANTABEN RAMANLAL PATEL, who died on 19/11/2020, on Patel Park Society, at Himatnagar, Taluka-Himatnagar, Distt, Sabar Kantha. Of Gujarat State, India, in respect of her share in the properly mentioned herein under in schedule standing in the name of Deceased as co-sharer / holder with other which described as under :

**SCHEDULE OF PROPERTY**

| S. No. | Village / City | Shop No. | Floor No. | Building Name | Plot No. | Sector No. | Admeasuring Area |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | KHARGHAR PANVEL | 14 | GROUND FLOOR | TWINS CHS LTD | 57 | 20 | 63.83 Sq.Mts. Built-up Area (53.19 Sq.Mts. Carpet Area) |

WHEREAS if any person has any Objections, Titles, Claims, Share etc. in the property herein under mentioned then they may appear in person or through their Advocates, objecting this application. If no one appears and objects for the same within 30 days from the date of this notice then this Hon'ble Court will proceed th pass the necessary order thereon.

Given under my hand and seal of this Court on this 18/09/2021.

Sd/-
Jr.Clerk
Civil Court, Panvel S.D.

Court Seal

Sd/-
Assit.Superintend
Civil Court, Panvel S.D.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## धमकी देणाऱ्या विरोधात गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

माझ्यासोबत शारिरीक संबंध ठेवून नाहीतर तुझ्या मुलीचे काढलेले व्हिडीओ व्हायरल करील अशी धमकी देणाऱ्या एका इसमाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

एका २५ वर्षीय महिला ही व्यवसायाने बार सिंगर आहे. हिला आरोपी शशिकांत खरात (रा.पलावा सिटी, कल्याण) याने करंजाडे सेक्टर ४ येथील एका बिल्डींगमध्ये फिर्यादी व तिच्या मुलीला वारंवार मारहाण करून तिच्या मुलीच्या अंगावरील कपडे काढून त्याचे नग्न व्हिडीओ बनवून तिच्यासोबत अश्लिल चाळे करून सदर महिलेस शारिरीक संबंध ठेव नाही तर तुझ्या मुलीचे काढलेले व्हिडीओ व्हायरल करीन अशी धमकी देणाऱ्याविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून त्यानुसार सदर आरोपीचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

## उरणमध्ये हळव्या जातीच्या भातपिकाच्या कापणी व मळणीला सुरुवात

**दै.रायगड नगरी । उरण**

पावसाने उघडीप घेऊन कडकडीत ऊन सुरू झाल्याने ९० दिवसांनी तयार होणाऱ्या हळव्या भात पिकांच्या कापणी आणि मळणीला सप्टेंबर महिन्यातील दुसऱ्या आठवड्या पासून शेतकऱ्यांनी सुरवात केली आहे.

या वर्षी चक्रीवादळामुळे अचानक आलेल्या पावसामुळे शेतकऱ्याच्या पेरण्या मे महिन्यातच झाल्या होत्या.त्यामुळे ९० दिवसात तयार होणाऱ्या भातपिकाला भर पावसाळ्यात लोंब्या आल्या होत्या.परिणामी ऑक्टोबर च्या पहिल्या आठवड्यात तयार होणारे हळव्या जातींचे भातपिक सप्टेंबरच्या मध्यातच तयार झाल्याने भातपिकाची काढणी कशी करावी असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला होता.

अगोदरच सततच्या पावसमुळे शेती वाया जाण्याची भीती होती मात्र मुदती साधी पिकलेली शेती कापण्याची संधी पावसाने उघडीप दिल्याने मिळाली आहे.त्यामुळे शेतकऱ्यांनी आदीवासी मजूर घेऊन हे भातपिक कापून प्लास्टिकच्या ताळपत्रीचे खळे करून त्यावर पिकाची मळणीही सुरू केली आहे.चिरनेर विभागात आता या भातकापणीला जोमाने सुरुवात झाली आहे.

यावेळी बोलताना काशिनाथ खारपाटीली म्हणाले की, यावर्षी पाऊस लवकर सुरू झाल्याने भाताची पेरणी लवकर झाली पर्यायाने हळवे भातपिक भर पावसात फुलोऱ्याला आल्याने पावसाच्या पाण्याने फुलोरा नष्ट झाला त्यामुळे यावर्षी हे भातपिक कमी प्रमाणात आले आहे.पर्यायाने शेतकऱ्यांना तोटा सहन करावा लागत आहे.

# माथेरानच्या बाल तरुण गणेश मंडळाच्या सार्वजनिक गणेशोत्सवास ३६ वर्ष पूर्ण : नारायण सोनावणे

**दै.रायगड नगरी । माथेरान**

अनेकदा अंतर्गत मतभेदांमुळे कुठलीही सार्वजनिक संघटना असो, मंडळे असोत अथवा गट असोत हे सहसा फार कालावधी पर्यंत तग धरत नाहीत परंतु आम्ही ३६ वर्षांपूर्वी स्थापन केलेल्या आणि विशेष म्हणजे त्यावेळेस मी आपल्या मित्र परिवाराचा सुध्दा सार्वजनिक गणेशोत्सव असावा जेणेकरून सर्वजण एकोप्याने आणि गुण्यागोविंदाने सहभागी होऊ शकतात. यातूनच प्रत्येकाच्या आचार अन विचारांची देव–णघेवाण होऊ शकते या छोट्याशा मंडळामुळे मित्र परिवारा मधील संघटन अधिकाधिक मजबूत होऊन एकतेचा आणि सामजिक बांधिलकी जपण्यासाठी प्रयत्न होऊ शकतो यासाठी आम्ही स्थापन केलेल्या संत रोहिदास नगर येथील बाल तरुण गणेश मंडळाच्या सार्वजनिक गणेशोत्सवास ३६ वर्ष पूर्ण झाली आहेत याचे खूपच समाधान वाटत असल्याचे मत माथेरानचे भूमिपुत्र रायगड भूषण शिक्षक नारायण भिकू सोनावणे यांनी व्यक्त केले आहे.

आज समाजाला व्यासपीठ उपलब्ध आहे. त्याकाळी तशी खूपच प्रतिकूल परिस्थिती होती. परंतु मंडळातील सर्वांनी वेळोवेळी सावरून नेले. गणेश मंडळ जीवनमुल्य जोपासित माथेरानचे पर्यावरण समृध्द करण्याचा प्रयत्न नवीन मंडळातील सदस्यांसह सर्वजण श्रमदानातून करीत आहेत.



समाजाचा सार्वजनिक गणपती असावा असा मनोदय प्रथम मी मारुती सोनवणे व सीताराम तांबे यांजकडे व्यक्त केला.तदनंतर त्यांनी माझ्यासह शंकर तांबे, राकेश काळे, दिलीप सोनवणे आणि मित्रांना चांभार पाणी येथे बोलावून घेतले. तशी सहचर्चा केली नी १९८४ साली पाहिलेले स्वप्न आम्ही सर्वांनी १९८५ मध्ये साकारले.

माथेरानमध्ये ग्रामदैवत पिसरनाथ मंदिर हे जगप्रसिद्ध आहेच. संस्कृतिक वारसा माथेरानला मोठा आहे. येथे विविध गणेश मंडळ गणेशोत्सवात मोठ्या आनंदात सक्रिय होतात. माघी गणेशोत्सव आणि गणेश चतुर्थी ते अनंत चतुर्दशी पर्यंत सर्व आनंदात सण साजरा करतात. गणपती विसर्जनची मिरवणूक अत्यंत मनमोहक व शिस्तबध्द पाहण्यासारखी असते. हे एक माथेरानचे वैशिष्ट आहे. निसर्गाचे भान ठेवून गणपती उत्सव साजरा करणाऱ्या अनेकात एक रोहिदास नगर मधील बाल तरुण गणेश मंडळाचा गणपती होय. माथेरान मधील ३६ वर्षापूर्वीची गोष्ट आहे. बंगलेवाले व मोलमजुरी करणारे अशी फळी होतीच.सर्व सामान्य नित्य क्रम कंठीत असताना जीवन शैलीत कमालीचा फरक होताच.आमच्या समाजात तशी प्रतिकूल परिस्थिती होती. तरुणांना रोजगार नव्हता. आम्ही मुले तसे सरस्वती मंदिर या शाळेमध्ये शिक्षण घेत होतो. पण कुटूंबाला हातभार म्हणून जवळ जवळ सर्व मुले पारंपरिक व्यवसाय करीत होती. थोड्या पैशाच्या मिळकतीत शिक्षणाकडे दुर्लक्ष होत होते.पूर्वी पासून भजन मंडळीने मोठ्या श्रध्देने भजन, कीर्तन करून संत साहित्य परंपरा समाजात प्रवाहित ठेवली. ज्यांचे ऋण समाजावर आहेत. त्यामध्ये वंदनीय सीताराम तांबे,श्री बी.टी.पवार, रघुनाथ साळुंके, अनंत साळुंके, मारुती सोनवणे, आनंद सोन–वणे, विठ्ठल काळे, शंकर कारंडे, हनुमंत साळुंके आणि अज्ञात सर्व यांचं मोलाचे योगदान लाभले होते.

प्रारंभीच्या काळात श्री दिनकर काळे यांनी मंडळाला खूप मदत केली. आणि प्रेरित केले. समाजाच्या सहकार्यातून मानवतेचे, श्रद्धेचे हे मंदिर निर्मितीची संकल्पना साकारता आली याचे खूपच समाधान वाटते.या मंडळाच्या माध्यमातून दरवर्षी गणेशोत्सव काळात गाव–ातील प्रतिष्ठित मंडळींना सन्मानित करण्यात येत असते ही खरोखरच कौतुकास्पद बाब आहे असेही नारायण सोनावणे यांनी सांगितले आहे.

# विक्रांत पाटील आयोजित गणपती बाप्पा रंगवा स्पर्धेला बच्चे कंपनीचा भरघोस प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आपल्या प्रभागातील नागरिकांच्या कला–गुणांना वाव मिळावा यासाठी नगरसेवक विक्रांत पाटील हे नेहमी प्रयत्नशील असतात. याचाच एक भाग म्हणून कोविडमुळे घरात बसून राहण्याची जबरदस्तीच्या सुट्टीमुळे कंटाळलेल्या प्रभाग क्रमांक १८ च्या लहान मुलांच्यासाठी गणपती बाप्पा रंगवा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचे उदघाटन पनवेल विधानसभा आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले.

चिंतामणी हॉल येथे ५–९ आणि १०ते १५ पंधरा वर्ष अशा दोन वयोगटासाठी ही स्पर्धा घेण्यात आली होती. बच्चे कंपनी या स्पर्धेला उत्स्फूर्त असा प्रतिसाद दिला. कोविडमुळे बरेच दिवस कोणतेही उपक्रम किंवा स्पर्धा होत नसल्या कारणाने लहान मुले हिरमुसली होती. या स्पर्धेच्या आयोजनामुळे लहान मुलांच्या चेहऱ्यावरचा आंनद दिसून येत होता आणि त्यात आपल्या बाप्पाला स्वतःच्या हाताने रंगवयचं या



संकल्पनेने मुलांचा उत्साह ओसंडून वाहत होता. दोन्ही गट मिळून २५० मुलं–मुलींने या स्पर्धेत सहभाग घेतला. लहान मुलांच्या बरोबर पालकांचा उत्साह ही या स्पर्धेसाठी दांडगा होता. माझा बाप्पा किती छान, माझा बाप्पा माझा अभिमान या सेल्फी पॉइंट वर कार्यक्रमासाठी आलेल्या प्रमुख पाहुण्यांच्या बरोबर बच्चे कंपनीने सेल्फी काढली.तसेच सहभागी सर्व स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते सहभाग पत्रही देण्यात आले. गणपती बाप्पा रंगवा स्पर्धेसाठी पनवेलच्या महापौर सन्मा.सौ कविता चौतमोल, कोकण म्हाडा मा.सभापती बाळासाहेब पाटील, पनवेल शहर भाजपा अध्यक्ष जयंत पगडे, नगरसेवक– ओबीसी मोर्चा प्रदेशाध्यक्ष मनोज भुजबळ, सभापती प्रभाग समिती नगरसेविका हेमलता म्हात्रे, नगरसेविका रुचिता लोंढे, नगरसेविका संजना कदम, भाजपा युवा नेते समीर कदम, नगरसेवक नितीन पाटील, भाजपा युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य प्रशांत कदम, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, भाजपा माजी तालुका अध्यक्ष पनवेल तानाजी खंडागळे, भाजप नेते प्रदीप देशमुख, भाजपा नेते देविदास खेडकर व इतर मान्यवर उपस्थित होते.

# सुकेळी विभागातील कंपन्यांमध्ये विश्वकर्मा पुजा उत्साहात साजरी

**दै.रायगड नगरी । वाकण**

सध्याच्या परिस्थितीमध्ये कोरोनाचे सावट असतांनाही थोड्या फार प्रमाणात का होईना सर्वच सण कोरोनासंबधी नियमांचे पालन करीत उत्साहमय वातावरणात साजरे होत आहेत. याच पार्श्वभूमीवर नागोठण्याजवळील ऐनघर (ता.रोहा) ग्रामपंचायत हद्दीमध्ये येणाऱ्या कंपन्यांमध्ये शुक्रवार दि.१७ रोजी विश्वकर्मा पुजा उत्साहात संपन्न झाली.

सुकेळी येथील महाराष्ट्र सिमलेस लिमिटेड, विभोर, जिंदाल सॉ, रायगड प्लास्टिक, जिंदाल ड्रिलिंग या कंपन्यांमध्ये विश्वकर्मा पुजा अंत्यंत उत्साहमय वातावरणात संपन्न झाली. काही कंपन्यांमध्ये विश्वकर्मा मुर्तींचे तर काही ठिकाणी विश्वकर्मा फोटोचे पुजा करण्यात आली.



येथील महाराष्ट्र सिमलेस कंपनी अंतर्गत असलेल्या आय.सी.सी कंन्स्ट्रक्शनमध्ये देखील कोरोनामुळे यावर्षी विश्वकर्मा फोटोचे तसेच सर्व यंत्रसामग्रीचे विधिवत पूजन करण्यात आले. या विश्वकर्मा पुजेच्या वेळी नेहमीच कामावर व्यस्त असलेल्या आय.सी.सी मधील सर्वच कामगारांच्या चेह–यावर एक वेगळाच आंनद पहायला मिळाला.

त्यानंतर रात्री जागरण म्हणुन भजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करुन विश्वकर्मा पुजा उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी आय.सी.सी कंन्स्ट्रक्शनमधील सर्व कामगार, महिला, लहान मुले उपस्थित होते.

# जिल्ह्यात दि.२ ऑक्टोबर पर्यंत स्वच्छता सेवा अभियानाचे आयोजन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

भारताच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या वतीने शासनाच्या विविध उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्यानुसार दि.१५ सप्टेंबर २०२१ पासून जिल्ह्यात स्वच्छ्ता सेवा अभियानांतर्गत गावे स्वच्छ, सुंदर करण्यावर भर दिला जात आहे. हे अभियान दि.२ ऑक्टोंबर २०२१ पर्यंत राबविण्यात येणार असल्याची माहिती, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील व पाणी व स्वच्छता विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. ज्ञानदा फणसे यांनी दिली आहे.

स्वच्छता सेवा अभियान अंतर्गत दि.१९ सप्टेंबर २०२१ पर्यंत स्वच्छतेमध्ये उत्कृष्ट काम केलेल्या व्यक्तींचा सत्कार तसेच शोषखड्डे, कंपोस्ट खड्डे बनविण्यात येणार आहेत. दि. २० व दि.२१ सप्टेंबर २०२१ दरम्यान तालुका व ग्रामपंचायत स्तरावर स्वच्छ्ता महाश्रमदान मोहिमेचे आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये शासकीय व सार्वजनिक इमारतींची स्वच्छता, प्लास्टिक कचऱ्याचे संकलन त्याचे व्यवस्थापन तसेच गावागावात वृक्ष लागवड करण्यात येणार आहे. तसेच दि.२१ सप्टेंबर ते दि. ०१ ऑक्टोंबर २०२१ दरम्यान गावागावात प्लास्टिक बंदीबाबत शपथ व ठराव मंजूर करणे, सरपंचांसोबत ई–संवाद साधणे, ओडीएफ प्लस बाबत ग्रामसभेत ठराव घेण्यात येईल. तर दि.२ ऑक्टोंबर २०२१ रोजी स्वच्छ भारत दिवसाचे आयोजन व गावे ओडीएफ प्लस घोषित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

या अभियानांतर्गत गावे स्वच्छ सुंदर होण्यास मदत होणार आहे. या विविध उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी खासदार, आमदार, जिल्हा परिषद अध्यक्ष, जिल्हा परिषद पदाधिकारी व सदस्य, पंचायत समिती पदाधिकारी व सदस्य, ग्रामपंचायतस्तरावरील सरपंच व सदस्य सर्व कर्मचारी, स्वयं सहाय्यता बचत गट या सर्वांचा सहभाग घेण्यात यावा, या उपक्रमांचे सनियंत्रण करण्यासाठी नोडल अधिकारी म्हणून विस्तार अधिकारी (पंचायत) यांची नेमणूक करण्यात यावी अशा सूचना संबंधित विभागांना करण्यात आल्या आहेत. विविध उपक्रमांची अंमलबजावणी विहीत वेळेत होण्यासाठी आणि जिल्हास्तरांवर अहवाल सादर करण्याची जबाबदारी गट समन्वयक व समूह समन्वयक यांच्यावर सोपविण्यात आली आहे.


मे.इंदलकर साो.यांचे कोर्टात

अॅड.निलेश द. हातमोडे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साो.यांचे कोर्टात

क्रिमिनल एम.ए.नं.९७४/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.१२/११/२०२१

श्री.नारायण लहू हातमोडे
वय : ६५ वर्षे, धंदा : शेती
रा.मु.गिरवले, पो.सोटमणे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

ग्रामसेवक अधिकारी
ग्रामपंचायत गिरवले
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, अर्जदार यांचे वडील कै.लहू आंबो हातमोडे दि.२०/०८/१९६९ रोजी मु.गिरवले, पो.सोटमणे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेले आहे. वरील अर्जदार श्री.नारायण लहू हातमोडे यांचे वडील कै.लहू आंबो हातमोडे यांचे मृत्यू नोंदणी करण्यासाठी व मृत्यूदाखला मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेले आहे. तरी सदर अर्जाबाबत इतर कोणाचा हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात दाखल करावी.

वरील पद्धतीची कोणतीही हरकत न दाखविल्यास सदरहू अर्जदारांच्या मागणीनुसार मृत्यू नोंद होवून मृत्यू दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज दि.१८/०९/२०२१ रोजी दिली.

सही/– क.लिपीक फौ.न्या.क.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक फौ.न्या.क.स्तर, पनवेल



मा.गोडसे मॅडम

अर्जदारातर्फे वकील
अॅड.सागर एस. जगे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१२०२/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२८/१०/२०२१

श्रीमती.सुरेखा गोपाळराव कदम, वगैरे — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, मौजे : पेणधर, ता.पनवेल, जि.रायगड येथी मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**१) संपादीत मिळकतींचे वर्णन**

**मौजे : पेणधर, ता.पनवेल, जि.रायगड**

| मौजे | अंतिम निवाडा नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| पेणधर | पेणधर १/२००८ | २५० | १८ | ०–२०–० | ०=०० |
| | | २५८ | १ | ०–२५–० | ०=०० |
| | | २५९ | १२ अ | ०–२६–० | ०=०० |

२) मौजे : कोयनावेळे, ता.पनवेल, जि.रायगड येथील स.नं.४१/अ/१०० या मिळकतीवर असणारे, पनवेल महानगरपालिका हद्दीतील घर क्रं.३६, एकूण क्षेत्र ११०.०३ चौ.मी. येणेप्रमाणे कै.गोपाळराव शंकरराव कदम यांच्या मिळकती आहेत.

कै.गोपाळराव शंकरराव कदम हे दि.०५/०६/२०१० रोजी कोयनावेळे येथे मयत पावले असून, त्यांना अर्जदार क्रं.१) श्रीमती.सुरेखा गोपाळराव कदम २) श्री.प्रमोद गोपाळराव कदम ३) श्री.सचिन गोपाळराव कदम, ४) प्रफुल्लता गोपाळराव कदम, उर्फ सौ.प्रफुल्लता प्रदीप शिंदे ५) श्रीमती.वैशाली गोपाळराव कदम उर्फ सौ.वैशाली म.शिंदे, सर्व रा.घर नं.३६, कोयनावेळे, ता.पनवेल, जि.रायगड ६) संयोगीता गोपाळराव कदम उर्फ सौ.दिव्या दिलीप दळवी, रा.रुम नं.१२, साईहिल, भांडूप (वेस्ट), सबब अर्जदार हेच कै. गोपाळराव शंकराव कदम यांचे कायदेशीर वारस आहेत.

अर्जदार यांनी कै.गोपाळराव शंकरराव कदम यांच्या मृत्यूच्या पश्चात वारस दाखला मिळणेसाठी मे.दिवाणी न्यायालयात सदरचा अर्ज दाखल केला आहे. वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करण्यासंबंधी कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार असल्यास त्यांनी त्यांचे वकीलांमार्फत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.न्यायालयात सादर करावी. विहित मुदतीत हरकत सादर न केल्यास मे.न्यायालय योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील, तसेच मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.१८/०९/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली आहे.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



मुजावर साहेब कोर्ट

अर्जदाराचे वकील श्री.विकास एस.पाटील

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१२३४/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२५/१०/२०२१

सौ.बेबीबाई शंकर बंडा
वय : ६४ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मोठी जुई, ता.उरण, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कै.नथु गावंड यांची मयत मुलगी कै.शांतीबाई उर्फ शांताबाई जानू जोशी रा.मोठीजुई, ता.उरण, जि.रायगड ह्या दि.२४/१०/१९८५ रोजी मौजे : मोठीजुई, ता.उरण, जि.रायगड येथे मयत झाल्या आहेत. कै.नथु गावंड मुळ पुरुष यांच्या मृत्यूपश्चात अर्जात नमूद केलेल्या मिळकती ह्या त्यांच्या वारसांच्या नावे वारसाहक्काने आलेल्या असून कै.शांतीबाई उर्फ शांताबाई जानू जोशी यांचे नाव सुद्धा सदर मिळकतींना वारस म्हणून लागलेले असून सदर मिळकती ह्या महाराष्ट्र शासनाने नवी मुंबई प्रकल्पाकरिता संपादीत केलेल्या आहेत. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| गाव | यु.के.नं. | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| वडघर | १०३ | १३२ | ५ अ | ०–११–२ | २.४६ |
| वडघर | ६७ | १२१ | ७ | ०–०९–६ | १.८१ |
| वडघर | ११४ | ४८ | ४ | ०–०३–० | ०.५८ |
| | | ११८ | ३ | ०–२२–८ | ४.४४ |
| | | १२३ | १ | ०–१०–६ | १.९४ |
| | | १२४ | १ | ०–७७–४ | १६.१३ |
| | | १२२ | २ | ०–२४–८ | ४.६९ |
| | | १२५ | ४ | ०–५८–४ | १३.५९ |
| वडघर | ७ | १३२ | ५ ब | ०–०८–३ | १.८४ |
| वडघर | ७७ | १२२ | ५ क | ०–०८–६ | १.८८ |

वरील अर्जदार हे कै.शांतीबाई उर्फ शांताबाई जानू जोशी यांचे कायदेशीर वारस आहेत ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.शांतीबाई उर्फ शांताबाई जानू जोशी यांच्या वारस पत्रास हक्कदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.१८/०९/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



मा.गोडसे मॅडम

प्रो.जमा.६–२५ — अर्जदाराचे वकील अॅड.दिनेश पाटील

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो.यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१२३९/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२६/१०/२०२१

कै.भाऊसाहेब धोंडीराम वाघमारे (मयत तर्फे वारस)
१) श्रीमती.नर्मदा भाऊसाहेब वाघमारे
वय : ५५ वर्षे, धंदा : गृहिणी
२) सौ.अनिता विजय चंदनशिव
वय : ३९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.दत्तनगर, शंकरधाम हॉस्पिटल जवळ,
रामनगर समोर, चिंचवड ईस्ट, पुणे–४११०१९
३) सौ.श्रुती प्रवीण खंडागळे
वय : ३५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.रुम नं.१०२, अे विंग, भागीरथी स्वप्न सीएचएस,
जाधव कॉलनी जवळ, बेलवली, कल्याण–
बदलापूर रोड, बदलापूर पश्चिम, ठाणे–४२१५०३
४) कु.प्रतिज्ञा भाऊसाहेब वाघमारे
वय : ३२ वर्षे, धंदा : नोकरी
५) सुवर्णा भाऊसाहेब वाघमारे
वय : २९ वर्षे, धंदा : गृहिणी
६) श्री.अनिकेत भाऊसाहेब वाघमारे
वय : २० वर्षे, धंदा : शिक्षण
अनु क्र.१ ते ४ ते ६ रा.रुम नं.१०२,
साई सपना कॉम्प्लेक्स, आकुर्ली,
नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी कै.भाऊसाहेब धोंडीराम वाघमारे यांचे दि.१५/११/२०१८ रोजी लेबर कॉम्प्लेक्स, डीस्पेन्सरी पी.एल.लोखंडे मार्ग, चेंबूर म्युनिसिपल स्कूल जवळ, चेंबूर (वेस्ट), मुंबई येथे निधन झालेले आहे. त्यांचे नावे खालील वर्णनाची मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : शिलोत्तर रायचुर, ता.पनवेल, जि.रायगड**

| मौजे | मालमत्ता क्रं. | क्षेत्र चौ.फूट/चौ.मी. | बांधकामाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| शिलोत्तर रायचुर | २०१ ब | २०० | आर.सी.सी. स्वरुपाचे पक्के घर |

यानंतर सदरहू स्थावर मिळकती संक्षिप्ततेसाठी ''सदर सदनिका'' असे संबोधण्यात येईल.

कै.भाऊसाहेब धोंडीराम वाघमारे यांचे मृत्यूपश्चात त्यास अर्जदार हे वारस आहेत. सदर वारसाव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहेत. सदर वारसाव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारसदाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१७/०९/२०२१ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## ३१ वर्षीय तरुण बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

हॉस्पिटलमध्ये जाण्यासाठी निघालेला ३१ वर्षे तरुण काहीही न सांगता निघून गेला. त्यामुळे तो हरवला असल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात देण्यात आली आहे.

अजीवली येथील ललन नीलो यादव हॉस्पिटलमध्ये जाण्यासाठी निघाला असताना काहीही न सांगता निघून गेला. त्याचा सर्वत्र शोध घेतला मात्र आढळून आला नाही. त्याचा रंग गोरा, चेहरा गोल, डोळे काळे आहेत. त्याची उंची १६६ सेमी, मध्यम बांधा आहे. त्याने अंगात पांढरा रंगाचा फुल शर्ट व काळ्या रंगाची पँट घातली आहे. त्याला हिंदी भाषा बोलता येते व समजते. याबाबत अधिक माहिती असल्यास पोलीस हवालदार शरद घुगे यांच्याशी संपर्क साधावा.

## खारगाव ग्रामपंचायत हद्दीमध्ये कोरोना लसिकरण

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील खारगाव ग्रा. पंचायत हद्दीतील खारी,काजुवाडी, गुरूनगर व गौळवाडी येथे रोहे ग्रामीण उपजिल्हा रूग्णालय यांच्या सहकार्याने व ग्रा. पंचायत खारगाव यांच्या वतीने कोरोना लसीकरण मोहिम मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आली.

या मोहीमेतंर्गत कोविडशिल्डचा पहिला डोस खारी , काजुवाडी, गुरूनगर आणि गौलवाडी येथील २२० लाभार्थीना देण्यात आला.तर दुसरा डोस ८८ लाभार्थ्यांना देण्यात आला.यावेळी सौ नंदा शेळके, आशा सेविका, नितीन मालुसरे ,सतेज अपनकर ,शैलेश खिरीट,सुधीर मेहेतर,नंदा पाटील,वरणकर आदींसह गावातील मोठ्या संख्येने जेष्ठ नागरिक उपस्थित होते.खारगाव ग्रा.पं.सरपंच, उपसरपंच व सर्व सदस्य यांच्या प्रयत्नातून व प्रा.आरोग्य केंद्र आंबेवाडी यांच्या महत्त्वपूर्ण सहकार्याने राबविण्यात आलेल्या कोरोना लसिकरण मोहिमेबद्दल रहिवासी वर्गाकडून स्वागत करण्यात आले आहे.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# धबधब्यासोबत सेल्फीचा मोह जिवावर बेतू शकतो!

**दै.रायगड नगरी । पनवेल**


परतीचा पाऊस चांगला झाल्याने नद्या, नाले, धबधबे वाहू लागले आहेत. त्यामुळे पनवेल परिसरात पर्यटकांची संख्याही वाढली आहे. मात्र सेल्फीच्या मोहात अनेकजण स्वत:चा जीव धोक्यात घालताना दिसत आहेत.

रायगड जिल्ह्यात अनेक ठिकाणी धबधबे असल्याने निसर्गाच्या सान्निध्यात जाऊन काही वेळ घालविणाऱ्यांची पावले पनवेलकडे वळत आहेत. पावसाळ्यात अनेक जण पनवेल परिसरातील धबधब्यांना भेट देऊन निसर्गातील आनंदाचा लाभ घेतात. काहींना सेल्फी काढण्याचा मोह आवरत नाही. काळजी घेतली नाही तर हा मोह अपघाताला कारणीभूत ठरू शकते.

तलाव, नदीच्या किनारी अनेक सेल्फी काढण्याचा प्रयत्न करतात. यावेळी अनेकाना सभोवतालचे भान राहत नाही. सेल्फी काढ़ताना अनेक जण पडून जखमी झाल्याच्या घटना घडल्या आहेत. तर काहींचा जीव गेल्याच्या घटना यंदा घडल्या आहेत.

अनेक दिवसांच्या विश्रांतीनंतर परतीचा पाऊस चांगला झाल्याने पनवेल परिसरातील नद्या आणि धबधबे वाहू लागले आहेत. त्यामुळे धबधबे व ओसंडून वाहणारे धरणे, नद्या पाहण्यासाठी नागरिकांची प्रचंड गर्दी होत आहे. मात्र नद्या, धबधबा पाहण्यापेक्षा आजकाल प्रत्येकाच्या हातात मोबाईल आल्यामुळे, मोबाईलवर सेल्फी काढण्याचं फॅड गेल्या काही वर्षांमध्ये बरंच वाढलं आहे. पण त्यासोबतच दुर्दैवाने सेल्फी काढताना झालेल्या दुर्घटना देखील वाढत आहेत. दुसरीकडे धरणातसुद्धा पाण्याची पातळी वाढली आहे. नदीचे आणि धबधब्याचे हे रूप पाहण्यासाठी सकाळपासूनच नागरिकांची या ठिकाणी गर्दी होत आहे. धबधब्याचा परिसर पर्यटकांच्या गर्दीने फुलून जात आहे. उंचावरून कोसळणारा धबधबे आणि नदीचे विहंगम दृश्य पाहताना तेथे सेल्फी काढण्याचा मोह अनेकांना अनावर होत आहे. स्वत:चा आणि इतरांचाही जीव धोक्यात घालून सेल्फी काढणारे नागरिक येथे पहावयाला मिळत आहेत.

स्थानिकांचे ऐकायला विसरू नका- प्लॅनिंगशिवाय धबधब्याला भेट देऊ नका. स्थानिकांचे ऐकायला विसरू नका. पर्यटकांनी नदयामध्ये पोहण्याचा प्रयत्न करू नये. धोक्याची सूचना देणारे फलक लावले -पनवेल तालुका पोलिसानी अनेक ठिकाणी पर्यटकाना सूचना देणारे फलक लावले आहेत मात्र त्याकड़े पर्यटक दुर्लक्ष करत आहेत. जीवाला धोका -पनवेल येथील गाढ़ेश्वर परिसर, कुंडी धबधबा या ठिकाणी दरवर्षी पर्यटकांचा मृत्यू होतो. अती उत्साही पर्यटकामुळे या ठिकाणी येण्यावर बंदी घालण्यात आलेली आहे.



# माणुसकी प्रतिष्ठान महाराष्ट्रतर्फे पोयनाड येथे निर्माल्य संकलन व स्वच्छता

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

माणुसकी प्रतिष्ठान महाराष्ट्र तर्फे १८ सप्टेंबर २०२१ रोजी सकाळी ६ वाजल्यापासून ते १० वाजेपर्यंत पोयनाड येथील बाजारपेठ तलावामध्ये पडलेला भरपूर कचरा, निर्माल्य, व आजूबाजूच्या परिसरात पडलेला प्लास्टिक कचरा हे सर्व गोळा करून योग्य ठिकाणी विल्हेवाट लावण्यात आले.



यासाठी माणुसकी प्रतिष्ठान जीतनगर अलिबाग व नवकला कृती फाउंडेशन रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने आज निर्मल गणेशोत्सव कार्यक्रमांतर्गत स्वच्छता मोहीम राबवण्यात आली रायगड जिल्हा सीईओ डॉ. किरण पाटील यांच्या आवाहनानंतर माणुसकी टीम तसेच रायगड जिल्ह्यातील बरेच अशा संस्था निर्मल गणेशोत्सव साजरा करत आहेत तर त्यापैकी एक हा कार्यक्रम आहे, यामध्ये स्वच्छता व आरोग्य या दोन महत्त्वाच्या गोष्टीचा विचार करून बरेचसे कार्यक्रम राबवण्यात आले. माणुसकी प्रतिष्ठान चे अध्यक्ष डॉ. राजाराम हुलवान व नवकला कृती फाउंडेशन रायगडचे श्री देवेंद्र केळुसकर यांच्या पुढाकाराने आज पोयनाड येथील बाजारपेठ तलावाच्या आसपासचा परिसर स्वच्छ करण्यात आले यावेळी रायगड जिल्हा परिषदेकडून जयवंत गायकवाड भेट देऊन सिईओ डॉ. किरण पाटील व डेप्युटी सीईओ डॉ. ज्ञानदा फणसे यांच्या तर्फे योग्य ते मार्गदर्शन करून तसेच श्रमदानात हातभार लावून पुढील कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या.


यावेळी माणुसकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ राजाराम हुलवान यांनी गावात किंवा आजूबाजूला कचरा टाकू नये व कोरोनाचे नियम पाळून उत्सव साजरा करावा व रोगराई पूर्ण घालवावी याबद्दल मार्गदर्शन केले. या श्रमदानास माणुसकी कार्यकारी अध्यक्ष तानाजी आगलावे, उपाध्यक्ष सतीश कणसे, सदस्य ऋषिकेश वाडकर, दीपक म्हात्रे, राजू प्रसाद, सुधाकर निषाद, उमेश वाळंज, संजय काळेल, विकास मेटकरी, वरद आगलावे, विकास खैरनार, तसेच नवकला कृती फाऊंडेशनचे देवेंद्र केळुसकर,कौतुक निळकर, निलेश थळे, रीनेश गावित , राकेश जाधव आदि सदस्य व ग्रामस्थ या कार्यक्रमास उपस्थित होते. चहा पाण्याची व्यवस्था रायगड पोलिस विकास खैरनार यांनी केली.

# प्रितम म्हात्रे यांनी केली अपघातग्रस्तांना मदत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महत्वाच्या बैठकीला जात असताना पनवेल महापालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे याना अपघात झालेला दिसला. यावेली गाड़ी थांबवून प्रितम म्हात्रे यानी अपघातग्रस्ताना मदत केली आहे.

पालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे हे त्यांच्या कार्यकर्त्यासोबत एका महत्त्वाचे बैठकीला जात होते. दरम्यान पनवेल उड्डाणपूलावर काही नागरिक एकत्रितपणे उभे असलेले त्याना दिसले. प्रितम म्हात्रे यानी गाडी थांबवण्यास सांगितले आणि त्या ठिकाणी उतरले. त्या ठिकाणी एक अपघात झाला होता. ज्यात एक जण स्कुटर वरून खाली पडला होता. प्रितम म्हात्रे यानी त्या लहान मुलाला व त्यांच्या परिवाराची विचारपुस करून त्यांना मदत करण्यासाठी थांबले व त्याना मदत केली. यावेळी त्या परिवाराचे सदस्य व नागरिकांनी प्रितम म्हात्रे यांचे आभार मानले.



# अलिबाग तालुक्यातील विविध तलाठी कार्यालयांकरिता जागा हस्तांतरित

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

तलाठी कार्यालय हे नागरिकांसाठी ग्रामीण स्तरावरील अत्यंत महत्त्वाचे कार्यालय मानले जाते. या कार्यालयातून जनतेची महसूलविषयक सर्व प्रकारची महत्त्वाची कामे केली जातात.

ग्रामीण भागातील जनतेची महसूलविषयक कामे सुलभ व्हा-वीत, प्रशासन गतिमान व्हावे तसेच येथील अधिकारी- कर्मचाऱ्यांच्या व या कार्यालयात विविध कामांसाठी येणाऱ्या नागरिकांच्या दृष्टीने या तलाठी कार्यालयाची इमारत सुसज्ज व अद्ययावत असणे, ही काळाची गरज होती, या दृष्टीने पालकमंत्री या नात्याने कु.आदिती तटकरे यांनी व्यक्तिशः लक्ष देण्यास सुरुवात केली.

या पार्श्वभूमीवर सोगाव, खंडाळे, वरंडे, कुरकुंडी कोलटेंभी, घोटवडे, चिखली, चिंचोटी, कुर्डूस, बामणोली, केतकीचा मळा, ढवर, पेझारी या तलाठी कार्यालयांच्या इमारतींच्या बांधकामासाठी जमिनीची मागणी केली होती. याबाबत पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी संबंधितांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते.

त्यानुसार सोगाव येथील तलाठी कार्यालय मापगावसाठी क्षेत्र ०.०५.० हे.आर., खंडाळे येथील तलाठी कार्यालय, खंडाळेसाठी क्षेत्र ०.०३.० हे.आर., वरंडे येथील तलाठी कार्यालय, वरंडेसाठी क्षेत्र ०.०३.० हे.आर., कुरकुंडी कोलटेंभी येथील तलाठी कार्यालय व मंडळ अधिकारी कार्यालय, चरीसाठी क्षेत्र ०.०५.० हे.आर., घोटवडे येथील तलाठी कार्यालय, मल्याणसाठी क्षेत्र ०.०३.० हे.आर., चिखली येथील तलाठी कार्यालय, रावेतसाठी क्षेत्र ०.०५.० हे.आर., चिंचोटी येथील तलाठी कार्यालय, चिंचोटीसाठी क्षेत्र ०.०४.० हे.आर., कुर्डूस येथील तलाठी कार्यालय, कुर्डूससाठी क्षेत्र ०.०५.० हे.आर., बामणोली येथील तलाठी कार्यालय, बामणोलीसाठी क्षेत्र ०.०३.० हे.आर., केतकीचा मळा येथील तलाठी कार्यालय, पेढांबेसाठी क्षेत्र ०.०३.० हे.आर., ढवर येथील तलाठी कार्यालय, ढवरसाठी क्षेत्र ०.०३.० हे.आर., पेझारी येथील तलाठी कार्यालय, पेझारीसाठी क्षेत्र ०.०६.० हे.आर., ही जमीन महसूल मुक्त व सारामाफीने संबधित तलाठी कार्यालयाच्या इमारतीच्या बांधकामासाठी पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या निर्देशानुसार हस्तांतरीत करण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी जारी केले आहेत.

यामुळे खऱ्या अर्थाने महसूल प्रशासन गतिमान होऊन जनतेला महसूल विषयक सोयी सुविधा सुलभतेने मिळतील. विविध प्रशासकीय कार्यालयांच्या नव्या इमारतीसाठी व अद्ययावतीकरणासाठी पालकमंत्री कु.आदिती तटकरे करीत असलेल्या पाठपुराव्यामुळे प्रशासन निश्चितच गतिमान होण्यास मोठा हातभार लागणार आहे.

# ट्रेलरला धडकलेल्या जखमी घुबडाला सुजय कामेरकरने दिले जीवदान

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

निजामपूर एच पी पेट्रोलपंपचे मालक सुजय कामेरकर यांनी अपघाती जखमी झालेल्या दुर्मिळ घुबडाची सेवा सुसृषा करुन त्याला जीवदान दिले आहे. हे घुबड निजामपूर रोड नॅशनल हायवे ९७ वरुन पोस्को कंपनीच्या मालवाहतुक करणाऱ्या मोठ्या ट्रेलर च्या केबीनवर धडकल्याने अपघात ग्रस्त झाले होते.

धडकेने रस्त्यात पडलेल्या वन घुबडाकडे निजामपूर येथिल श्री विनायक पेट्रोल पंपचे मालक सुजय कामेरकर हे नेमके त्याच वेळी आपल्या पिटबूल जातीच्या पाळीव कुत्र्याला घेऊन फेरफटका मारत असताना या घटनेकडे त्यांचे लक्ष गेल्याने तात्काळ ते या घुबडाला वाचविण्या साठी धाऊन गेले. त्यांचा कुत्रा या जखमी घुबडावर झडप घालण्याचा प्रयत्न करत होता परंतु त्याला नियंत्रीत करीत, सुजय यानी घुबडाला अलगदपणे उचलले तरी सुध्दा घुबडाची अणुकुचिदार तिक्ष्ण नखे त्यांच्या हाताला लागली. याकडे दुर्लक्ष करीत सुजयने जवळच असलेल्या आपल्या घरी त्याला आणले व पाणी पाजण्याचा प्रयत्न केला व कुठे मार लागला आहे याचे निरिक्षण करुन पंखा जवळील झालेल्या जखमेवर हळद लावली.

घुबड घरातील दिव्यांच्या प्रकाशात गप्प बसुन राहीले असता सुजय यांनी पक्षीप्रेमी शंतनु कुवेसकर याचे जवळ संपर्क करुन ही घटना सांगितली. त्यावेळी त्यास हळदपाणी पाजण्याचे व काय खाऊ घालावे याबाबत माहिती मिळाल्याने वन घुबडास चिकन व मासे खाऊ घातले. आता ते वन घुबड तर-तरीत झाले, तरी सुध्दा काळजी पोटी सुजय कामेरकर याने पशु चिकित्सक घरत यांना बोलावुन त्यास तपासण्यास सांगितले. उत्सुकतेपोटी घुबडाचे घर-ातील वजन काट्यावर वजन देखिल केले. डॉक्टर घरत यांनी वन घुबडास तपासुन धनुर्वाताचे साधे इंजेक्शन दिले, व ते सुदृढ असल्याचे सांगितले. जवळपास अडिचतास सेवा सुसृषा करुन या घुबडास श्री व सौ. समृध्दी सुजय कामेरकर दांपत्याने आपले घरा बाहेरील अंगणात नेऊन सोडले. प्राण वाचलेल्या वन घुबडाने उडताना मागे वळुन घराकडे पाहत जणुकाही सुजयचे आभार व्यक्त करीत, स्वच्छंदपणे गर्द काळोखातील आकाशात झेप घेतली.

याबाबत पक्षीमित्र शंतनु यांनी दिलेल्या माहिती नुसार हे दुर्मिळ चट्टेरी वन घुबड (मॉटल्ड् वुड आऊल) असुन प्रसंगावधनाने सुजय यांनी त्याचे प्राण वाचविल्याने त्यांचे अभिनंदन करुन धन्यवाद दिले आहेत. या मोसमात घुबड प्रजातीतील सर्वच घुबडे रस्त्याच्या कडेला येऊन आपल्या शिकारी च्या शोधार्थ बसलेली आढळतात, त्यांना रस्यावरुन रेंगाळणारे सरपटणारे जीव साप, बेडुक, किटक-पतंगे सहज भक्ष करावयास मिळतात अशी माहीती शंतनु याने दिली आहे.

# दोन ट्रकमधील अपघातात चालकाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गुजरात येथून पुणे येथे माल घेऊन जाणारा भरधाव ट्रक पुढील ट्रकवर जोरदार धडकल्याने झालेल्या अपघातात ट्रक चालकाचा मृत्यू झाल्याची घटना सायन-पनवेल मार्गावर खारघर येथील उषणपुलावर घडली. सदर अपघात मृत ट्रक चालकाच्या निष्काळजीपणामुळे झाल्याचे आढळून आल्याने पोलिसांनी ट्रक चालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

सदर अपघातात मृत झालेल्या ट्रक चालकाचे नाव सुरेश पुजांजी खंदारे (४२) असे असून तो पुण्यातील आंबेगाव मंचर येथे राहण्यास होता. सुरेश आणि त्याचा मेव्हणा मिलींद साठे दोघेही मंचर येथील इनामदार यांच्या ट्रकवर चालक म्हणून काम करत होते. शिवाय ट्रकवर सुरेश आणि मिलींद दोघे एकत्र जात होते. तसेच आळीपाळीने ट्रक चालवत होते. या दोघांना गुजरात येथून पुणे फुरसुंगी येथे माल पोहोचविण्याचे काम मिळाले होते. त्यानुसार या दोघांनी गुजरात येथून आपल्या ट्रकमध्ये माल भरुन ते आळीपाळीने ट्रक चालवून पुण्याच्या दिशेने येत होते. दोघांनी वसई येथील ढाब्यावर जेवण केल्यानंतर रात्री त्यांनी पुन्हा पुण्याच्या दिशने प्रवास सुरु केला. त्यावेळी सुरेश खंदारे ट्रक चालवत होता, तर त्याचा मेव्हणा मिलींद झोपला होता. मध्यरात्री १२.३० वाजण्याच्या सुमारास त्यांचा ट्रक मुंबई-पुणे मार्गावर खारघर येथील उषणपुलावर आला असताना चालक सुरेश खंदारे याने ट्रक भरधाव वेगात चालवुन पुढे जाणाऱ्या ट्रकला जोरात धडक दिली. त्यामुळे सुरेशच्या पोटावर स्टेअरींग धडकून त्याचा पाय बोनेट आणि क्लचच्या मध्ये अडकला.

त्यामुळे मिलींदने त्याला इतर वाहन चालकांच्या मदतीने बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यात त्यांना यश आले नाही. त्यामुळे घटनास्थळी आग्नशमन दलाला पाचारण करण्यात आल्यानंतर आग्नशमन दलाच्या जवानांनी स्टेअरींग आणि क्लचचा भाग कापून अडकलेल्या सुरेशला बाहेर काढले. त्यानंतर त्याला कामोठे येथील एमजीएम हॉस्पीटलमध्ये दाखल करण्यात आले. मात्र, तेथील डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

# घरगुती पर्यावरण पूरक गणपती सजावट स्पर्धेचे पारितोषिक वितरण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महानगरपालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या कोशिश फाऊंडेशनच्या वतीने आयोजित केलेल्या 'बाप्पा मोरया घरगुती पर्यावरण पूरक गणपती सजावट स्पर्धे ला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या स्पर्धेचे पारितोषिक वितरण पनवेल महानगरपालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या हस्ते आणि नगरसेवक अनिल भगत, तेजस कांडपिळे, नगरसेविका दर्शना भोईर, रुचिता लोंढे यांच्या उपस्थितीत आज (दि. १८) येथे करण्यात आले.

गणेशोत्सवानिमित्त कोशिश फाऊंडेशनच्या वतीने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहर अंतर्गत प्रभाग क्रमांक १४, १८, १९ व २० मर्यादित हि स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेतील एकूण विजेत्यांना २५ हजार रुपयांची बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी कोशिश फाऊंडेशनचे सदस्य चिन्मय समेळ, अयुब अकुला आदी उपस्थित होते.

> गेल्या तीन वर्षांपासून या स्पर्धेचे आयोजन केले जात आहे. हि स्पर्धा यापूर्वी प्रभाग १९ पर्यंत मर्यादित होती. मात्र अनेक नागरिकांच्या आलेल्या सूचनेनुसार या स्पर्धेचा विस्तार करण्यात आला. स्पर्धेला दरवर्षी उत्तरोत्तर उदंड प्रतिसाद मिळत आहे, त्या बद्दल सर्व स्पर्धकांचे मनपूर्वक आभार.
>
> **- परेश ठाकूर, अध्यक्ष कोशिश फाऊंडेशन व सभागृहनेते पनवेल महानगरपालिका**



दिड दिवस घरगुती पर्यावरण पूरक गणपती सजावट स्पर्धा - प्रथम क्रमांक - आश्विनी खेडेकर आणि नेहा डोंगरे, द्वितीय क्रमांक - अक्षया चितळे, तृतीय क्रमांक - जगदिश गायकर, पाच दिवस घरगुती पर्यावरण पूरक गणपती सजावट स्पर्धा -प्रथम क्रमांक - संदीप मारुती शेळके, द्वितीय क्रमांक - विक्रांत रानडे, तृतीय क्रमांक - अंजली महाजनी. दहा दिवस घरगुती पर्यावरण पूरक गणपती सजावट स्पर्धा -प्रथम क्रमांक - साहित्या देशमाने